महानगरात रुजताना

सुभाष खैरे
author@esakal.com

# मुंबईचं ऋण न फिटणारं !



बडोदा इथं झालेल्या मराठी वाङ्मय परिषदेत नरेंद्र जाधव यांच्या हस्ते 'अभिरुची गौरव' पुरस्कार स्वीकारताना सुभाष खैरे.

कला शाखेची पदवी मिळाली. आता पुढं काय? बी. एड्.लाही प्रवेश मिळाला. आई-वडील एके ठिकाणी सालानं शेतीकामासाठी. मोठं कुटुंब. पोटं भरत नव्हती. जमीन-जुमला बेताचाच, तोही बहिणींच्या लग्नासाठी गहाण. शेतीचं उत्पन्न मिळत नव्हतं. त्यामुळं उपाशी पोटांना चिमटा अधिकच घट्ट बसायचा. उपासमार नेहमीचीच. कसंबसं बी. एड्. झालं. वाहेगाव साळ : लालचुटुक आणि तिखट अशा कांदा-उत्पादनाचं, खडकावर वसलेलं माझं गाव. याच खडकाळ गावात आठवीचा वर्ग सुरू केला. माध्यमिक शिक्षणाची मेढ वाहेगावात उभी राहिली. विनाअनुदानावर एकेक वर्ग वाढू लागला. शिक्षकांची संख्या वाढली. तशी एकमेकांवर कुरघोडीही वाढू लागली. उपाशीपोटी शिकवता शिकवता पोट अधिक खपाटी करून घेण्यापेक्षा गावाचा निरोप विचारपूर्वक घेतला.

मुंबईला आलो. या महानगरीत आलो खरा; पण आता पोट भरंल कसं, असं वाटायचं. कित्येक दिवस ते तसंच. उपाशीतापाशी. इंग्रजी माध्यमाची नोकरी मिळाली. कमी पगारावर काही दिवस काढले. पुढं ओळखीनं मराठी माध्यमाची कायम नोकरी मिळाली. दरम्यानची काही वर्षं जातीपातीच्या उठाबशीनं हलाखीचे गेले. खस्ता खाता खाता भुईवर पाय नीट टेकले. नोकरीत कायम झालो.

मुळात मला लेखनाची आवड. आकाशवाणीवर काही कथा प्रसारित झाल्या होत्या; पण मधल्या काळात लेखनापासून दुरावलो होतो. तेच जपून ठेवलेलं बाड परत उस्तरलं. त्याला अस्तर लावून 'गोईमाई' असं गावच्या नदीचं नाव देऊन शेतकरी-कष्टकरी बळीराजावर माझी पहिली ग्रामीण कादंबरी लिहिली. 'गुबूगुबू' या माझ्या कथासंग्रहात नंदीवाल्यांची आणि शेतकऱ्यांची कैफियत मांडलेली आहे. दोन्ही पुस्तकांना वाचकवर्ग लाभला. मान-सन्मानही मिळाले.

अनेक नियतकालिकांनी, साहित्यिकांनी या पुस्तकांचा विशेष उल्लेख केला. अरुण साधू, वसंत आबाजी डहाके, रंगनाथ पठारे, डॉ. म. सु. पाटील, उत्तम कांबळे, सदानंद देशमुख, प्रकाश होळकर, प्रा. विजय काचरे, सुहासिनी कीर्तीकर या आणि अशा अनेक साहित्यिकांनी प्रेम दिलं. हे सर्व कदाचित गावाकडं राहून शक्य झालं नसतं किंवा उपाशीपोटी असं काही सुचलंही नसतं!

महानगरी मुंबईत आजही कधीकधी पोटाला चिमटा बसतोच; पण ते कष्ट सोसायची आता सवय झाली आहे. या महानगरातली दूषित हवा आता इतकी अंगवळणी पडली आहे, की गावाकडची शुद्ध हवाही आता अंगाला जाचते! या महानगरात यश-अपयश पचवता पचवता पन्नाशीपर्यंतचे पाढे होत आले आहेत. आज मी या महानगरात स्थिर आहे. लेखनात सुधारणा होऊन गतीही वाढली आहे. निरनिराळ्या विषयांवर भरभरून लेखन होत आहे; शिकवण्याकडं दुर्लक्ष न करता!

शेतीचा मालक झाल्याचं शेतमजुराचं स्वप्न 'गुमसुम'मध्ये रंगवलंय; तर 'गुरुजी'मध्ये शिक्षकांची दयनीयता सांगितली आहे. या दोन कादंबऱ्या लवकरच प्रकाशित होतील. एवढं सगळं जे जमलं, ते गाव सोडावं लागण्यास कारणीभूत ठरलेल्या उपाशी पोटामुळंच. पोट भरलं आणि आता उरातल्या लेखनाच्या ऊर्मीमुळं साहित्यक्षेत्रात ठसा उमटवण्याचा खटाटोप सुरू आहे. साहित्यलेखनातून आर्थिक फायदा काहीच नाही; तरीही शब्द जागेवर बसू देत नाहीत! ते मनात रुंजी घालतात आणि उचंबळून कागदावर उतरतात. या महानगरीत खूप चांगली आणि प्रेमळ माणसं भेटली. भेटतही आहेत. त्यांचं प्रेम गावाएवढंच भरभरून मिळालं. माझ्याकडं धनदौलत नाही; पण शब्दसंपत्ती आहे. ही संपत्तीच कदाचित आयुष्याला वळण देऊ शकेल. महानगरी मुंबईचा मी कायमचा ऋणी राहीन. का, तर तिनं मला काम दिलं, माझी उपासमार टाळली, तिनं मला लेखनातून शब्दांचे धुमारे फुलवू दिले, घरदार, इटुकला-पिटुकला संसार दिला. म्हणून मागं वळून पाहताना नेहमीच समाधान वाटतं. मला जे अपेक्षित होतं, ते आवडतं काम मी करू शकलो आहे. पोटही भरतंय. लेखनही होतंय. याचं समाधान लाभतंय. संसारगाडाही चाललाच आहे.

या महानगरीत आल्यापासूनचा आणि अगोदरचाही प्रवास खडतरच होता. मात्र, आज मी ज्या ठिकाणी पोचलोय, तिथं पूर्णपणं समाधानी आहे. खरंच किमयागार आहे हीं महानगरी! मेहनतीचं चीज हे कधी ना कधी होतंच. त्यासाठीच निर्मिकानं आपली निर्मिती केली आहे. त्यानं जे या सृष्टीत निर्माण केलेलं नाही, ते निर्माण करण्याचं काम कलाकारावर सोडून दिलं आहे...तेच निमित्त साधून ते निर्माण करण्याचं काम कलाकार करत असतो!

चिंतन इमेज मेकर्स



**मुंबई :** वीरमाता जीजाबाई टेक्नीकल इन्स्टिट्यूटच्या वतीने राष्ट्रीय विधान दिनानिमित्त केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य व पुणे विद्यापीठाचे माजी उपकुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व पुरस्कार वितरण समारंभ व्हीजेटीआय महाजनी मार्ग, माटुंगा येथे संपन्न झाला. यावेळी डॉ. जाधव यांचे स्वागत करताना व्हीजेटीआयचे संचालक एम.सी. देव व उत्पादन अभियांत्रिकीव विभागाचे प्रमुख डॉ. डी. एन. राऊत आदि.

महानगरी

2/3/12

चिंतन इमेज मेकर्स